ई-लिलाव पध्दतीने एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि. यांचेमार्फत साखर खरेदी करण्याच्या विहित अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक साखर-१११७/प्र.क्र. १११/नापु-१७
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- २७ मार्च, २०१८

वाचावे:- शासन निर्णय क्रमांक साखर-२०१४/प्र.क्र. ७७/नापु-१९, दिनांक-१९ जून,२०१४

पार्श्वभूमी:- ई-लिलाव पध्दतीने एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि. यांचेमार्फत साखर खरेदी करण्याच्या विहित अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय:-

ई-लिलाव पध्दतीने एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि. यांचेमार्फत साखर खरेदी करण्याच्या अटी व शर्ती उपरोक्त दिनांक १९ जून, २०१४ च्या शासननिर्णयान्वये विहित केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २.८ व ८.१२ पुढ़ीलप्रमाणे सुधारित करण्यात येत असून परिच्छेद ४.४ नव्याने समाविष्ट करण्यात येत आहे.

सुधारित परिच्छेद २.८- मागील २ वर्षात प्रतिवर्ष उलाढाल रु. ४ कोटी रुपयापेक्षा कमी असता कामा नये.

नविन परिच्छेद ४.४- पुरवठादारांच्या नोंदणीवर शासनाचे नियंत्रण रहावे याकरिता सध्या प्रचलीत अटी शर्तीनुसार जी नोंदणीची प्रक्रिया एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि. पार पाडते त्यांना अंतिम मंजूरी देण्याकरिता सदर पुरवठादारांचे नोंदणी प्रस्ताव एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि. यांनी मूल्यांकन केल्यानंतर अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे पाठवावे

परिच्छेद ८.१२ मध्ये सुधारणा करण्यात येऊन सुधारीत परिच्छेद ८.१२ खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

सुधारीत परिच्छेद ८.१२ ई-लिलावात सहभागी झालेल्या सर्व बोलीदारांच्या बोल्या लिलावाच्या तारखेपासून जास्तीत जास्त १५ (पंधरा) कामकाजाच्या दिवसापर्यंत वैध असल्याच पाहिजेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२७१७२७०१३२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Dinkar Pathak

Digitally signed by Mahesh Dinkar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9535c95dc1a6714290a6a1e084b3bb4cc266f737f88ea4b79e3f83c4a7ca12d, cn=Mahesh Dinkar Pathak
Date: 2018.03.27 17:28:15 +05'30'

(महेश पाठक)

प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्यसचिव.
२. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव.
६. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव.
७. मा. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
८. मा.प्रधान सचिव, वित्त विभाग.
९. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
१०.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) , महाराष्ट्र, मुंबई
११.महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) , महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल-१ (लेखा परिक्षा) , महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) , महाराष्ट्र, नागपूर
१४.सर्व विभागीय आयुक्त,
१५.सर्व जिल्हाधिकारी,
१६.नियंत्रक, वैधमापनशास्त्र, मुंबई,
१७.नियंत्रक, शिधावाटप, मुंबई,
१८. संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई,
१९.उप संचालक, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
२०.वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
२१.सर्व उपायुक्त पुरवठा,
२२.सर्व अपर जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळता),
२३.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
२४.अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे/नागपूर/सोलापूर,
२५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९.विभागातील सर्व अधिकारी (सचिव वगळता),
३०. प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई,
३१.वित्त विभाग (व्यय-४/ विनियम कार्यासन),
३२.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३३.सहायक उपाध्यक्ष, एनसीडीईएक्स ई-मार्केटस् लि. (NEML),
आकृती कार्पोरेट पार्क, लाल बहादूर शास्त्री मार्ग,कांजूरमार्ग (पश्चिम), मुंबई- ४०० ०७८.
३४.निवड नस्ती, नापु-१७.